# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 06.08.2024** **वार– मंगळवार**

---

डेंगू मुक्त  शहर

शहराला डेंग्यू मुक्त करण्यासाठी महापालिकेच्या वतीने डेंग्यू मुक्त पिंपरी चिंचवड शहर ही मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेचा भाग म्हणून महापालिकेच्या वैद्यकीय विभागामार्फत "बीट डेंग्यू' ही संकल्पना राबविली जात आहे. यामध्ये नागरिकांनी आठवड्यातून एक तास आपल्या कुटुंबाच्या आरोग्यासाठी आपल्या राहत्या घरी स्वच्छता करायची आहे.
तसंच कुठेही पाणी साचू न देणे, आजुबाजुला डासांची निर्मिती होऊ न देणे, इतर कीटकजन्य माहिती असणे, आपल्या आजुबाजुला डेंग्यूचे रुग्ण आढळल्यास महापालिकेच्या रुग्णालयांना कळवणे आदी बाबींचा या मोहिमेत समावेश करण्यात आला आहे.

पाणी पुरवठा

पिंपरी चिंचवड शहराला पाणपुरवठा करणारं पवना धरण 94 टक्के भरले असून शहराला दररोज पाणी पुरवठा करावा अशी मागणी शरदचंद्र पवार राष्ट्रवादी पक्षाचे पिंपरी चिंचवड शाखेचे अध्यक्ष मयूर जाधव यांनी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्याकडे केली आहे. शहराला सध्या एक दिवसाआड पाणीपुरवठा होत आहे.

साखर परिषद

कृषि महाविद्यालय, पुणे, तसंच पुण्याच्या मिटकॉन कन्सल्टन्सी ॲण्ड इंजिनियरिंग सर्विसेस, साखर आयुक्तालय आणि दि एन्व्हाएरमेंट असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, कोल्हापूर यांनी येत्या 8 आणि 9 ऑगस्टला पुण्यातील कृषी महाविद्यालयात साखर आणि संलग्न उद्योग परिषद 2024 चं आयोजन केलं आहे. साखर आणि संलग्न उद्योगांचे चक्रीय अर्थव्यवस्था आणि पर्यावरणपूरक शाश्वततेसाठी योगदान या विषयी साखर आणि साखर उद्योगांशी संलग्न कारखान्यातील अधिकारी, पर्यावरण संबंधित केंद्र आणि राज्य शासनाचे अधिकारी, वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, शास्त्रज्ञ यांनी एकत्र येऊन या बाबतीत विचारांची महत्वपूर्ण देवाणघेवाण आणि विचारमंथन करावं यासाठी दोन दिवसीय परिषदेचं आयोजन करण्यात आलं आहे.

शेतकरी संवाद

फळे, भाजीपाला आणि त्यापासून प्रक्रिया केलेल्या अन्नपदार्थाच्या निर्यातीत देशात, महाराष्ट्र राज्य अग्रेसर असल्याची माहिती कृषी विभागाचे फलोत्पादन संचालक डॉ. कैलास मोते यांनी दिली. राज्याचा कृषी विभाग , केंद्राच्या अपेडा या संस्थेच्या वतीने यशदा येथे नुकत्याच आयोजित प्रशिक्षण कार्यक्रमात बोलत होते. शेतमाल निर्यातदार, निर्यातयोग्य शेतमाल उत्पादन करणा-या पुणे, अहमदनगर आणि सोलापूरसह अन्य जिल्हयातील शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या खरेदीदार -विक्रता संवाद आणि प्रशिक्षण कार्यक्रमात 225 शेतक-यांनी सहभाग नोंदवला.

झिका

पुणे शहरातील झिकाची रुग्णसंख्या दिवसेंदिवस वाढत असून ती आता 66 वर पोहोचली आहे. आतापर्यंत झिकाचा संसर्ग झालेल्या चार रुग्णांचा मृत्यू झाला असून सार्वजनिक आरोग्य विभागाची समिती या चार रुग्णांच्या मृत्यूंचे परीक्षण करणार आहे. यामध्ये 26 गर्भवती महिलांना झिकाची लागण झालेली आहे. 20 जूनपासून पुणे जिल्ह्यात झिका विषाणूचे 73 रुग्ण आढळले असून त्यात पुणे शहरातील 66, पुणे ग्रामीणमधील पाच आणि पिंपरी-चिंचवडमधील दोन रुग्णांचा समावेश आहे. गेल्या तीन दिवसात पुणे शहरात झिका विषाणूच्या संसर्गाची आठ प्रकरणे नोंदवली गेली असल्याची माहिती महापालिका आरोग्य अधिकारी डॉक्टर नीना बोराटे यांनी दिली आहे.

शिष्यवृत्ती

पुणे महापालिकेच्या वतीने इयत्ता दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना मौलाना अबुल कलाम आणि बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना लोकशाहीर अण्णाभाऊ साठे अर्थसहाय्य योजनेतंर्गत विशेष शिष्यवृत्ती दिली जाते. यंदाच्या वर्षी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीसाठी dbt.pmc.gov.in या संकेतस्थळावर ३०सप्टेंबर पर्यत अर्ज करावा अशी माहिती पुणे महापालिकेच्या समाज विकास विभागाचे उपायुक्त नितिन उदास यांनी दिली आहे.

जनजागृती

पुणे जिल्ह्यात झिका विषाणूची लागण झालेल्या रुग्णांची संख्या झपाट्याने वाढत असून पावसाळ्यात डेंगू आणि मलेशियाचाही प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता लक्षात घेत, जनसामान्यांना या विषाणूजन्य आजारांबाबतची लक्षणे आणि घ्यायवयाची काळजी याबाबतची सविस्तर माहिती आणि मार्गदर्शन मिळावे या हेतूने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने मंगळवारी चिंचवड येथील यशस्वी एज्युकेशन सोसायटीच्या इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट

सायन्सच्या यशस्वी भवन या शैक्षणिक संकुलात विशेष जनजागृती सत्र आयोजित केले होते. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आरोग्य अधिकारी राजू साबळे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

लाडकी बहीण
मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनाकरिता पुणे जिल्ह्यातील 21 ते 65 वयोगटातील 9 लाख 72 हजार 819 महिलांनी अर्ज सादर केले असून अर्जाची छाननी प्रक्रिया मोहीम सुरू करण्यात आली आहे. छाननी प्रक्रियेत आतापर्यंत 7 लाख 66 हजार 392 अर्ज स्वीकारण्यात आले आहेत, तर 795 अर्ज नाकारण्यात आले आहेत. त्रुटी असलेल्या अर्जाबाबत संबंधित महिलांना भ्रमणध्वनी संदेशाद्वारे कळविण्यात येत असून त्याप्रमाणे त्रुटींची पूर्तता करून कागदपत्रे सादर करावे तसेच उर्वरित पात्र महिलांनी 31 ऑगस्ट 2024 पर्यंत अर्ज करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

रस्ते डागडुजी
मनपा पथ विभागाने खड्ड्यांची डागडुजी अखेर सुरू केली आहे. गेल्या दोन दिवसात सुमारे 803 खड्डे बुजवण्यात आले आहेत.
ही माहिती मनपा पथ विभागाचे प्रमुख अनिरूद्ध पावसकर यांनी दिली. या खड्ड्यांची गंभीर दखल घेत केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी महापालिका प्रशासनाची बैठक घेत 24 तासांच्या आत खड्डेमुक्त रस्ते करण्याचे आदेश दिले होते.

जड वाहनांना बंदी
पावसामुळे पुण्यातील अनेक चौकांत खड्डे पडले आहेत. या खड्ड्यांमुळे होणारी वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी शहराच्या विविध भागातील 30 प्रमुख चौकांत ठराविक वेळेत जड वाहनांना बंदी घालण्यात आली. येत्या 12 ऑगस्टपर्यंत सकाळी नऊ ते रात्री दहा या वेळेत ही बंदी लागू आहे.

हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी 6 वाजता ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.